**जिल्हा परिषदेचे सांस्कृतिक स्नेह संमेलन संपन्न ..............**

कार्यक्रमातून **बेटी बचाओ, बेटी पढाओचा नारा**

ठाणे जिल्हा परिषदेच्या वतीने अधिकारी कर्मचारी यांचा वार्षिक सांस्कृतिक स्नेह संमेलन कार्यक्रम गडकरी रंगायतन येथे बुधवारी संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद अध्यक्ष मंजुषा जाधव यांच्या हस्ते पार पडले.

जिल्हा परिषद अधिकारी कर्मचाऱ्यासाठी दरवर्षी वार्षिक सांस्कृतिक स्नेह संमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमातून बेटी बचाओ, बेटी पढाओ हा संदेश देण्यात आला.

यावेळी उपाध्यक्ष सुभाष पवार, महिला व बाल कल्याण समिती सभापती दर्शना ठाकरे, उओ मुख्य कार्यकारी अधिकारी (सा) चंद्रकांत पवार, तसेच सर्व विभाग प्रमुख, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे शिक्षक, विविध विभागाचे कर्मचारी यांनी विविध कला सादर केल्या. या कार्यक्रमात नाटक, गायन, फॅन्सी ड्रेस, नृत्य आदी प्रकारात स्पर्धा घेण्यात आल्या. सगळ्यांनीच उस्फुर्त सहभाग घेत स्पर्धेत रंगत आणली. विशेष म्हणजे

शिक्षणाधिकारी संगीता भागवत यांनी गीत सादर केले.

या स्पर्धेसाठी लोककवी प्रशांत मोरे, शेखर राजे, सचिन गावडे, निधी प्रभू यांनी परीक्षण केले. तर कार्यक्रमाचे निवेदन विद्या शिर्के, संजय वेखंडे, शर्मिला ठाकरे, ज्योती बेलवले यांनी केले.

